


## महिला सर्व क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत ही बाब भूषणावह- अंजली आडे आयमातर्फे 23 महिला उद्योजकांचा सन

नाशिक-महिलांनी आता सर्वच क्षेत्रात उंच भरारी घेतली ही बाब भूष्णावाह आहे.त्यांच्यावर विश्वास दाखविला तर त्या पुरुषांपेक्षाही चांगले काम करू शकतात हे त्यांनी कृतीने सिद्ध करून दाखविले आहे,असे प्रतिपादन प्रमुख अतिथी उद्योग सुरक्षा खात्याच्या सहसंचालक अंजली आडे यांनी केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अंबड इंडस्ट्रीज अँड मनुफॅक्चरर्स असोसिएशन(आयमा) तर्फे उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या 23 महिला उद्योजिकांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मार्गदर्शन करताना अंजली आडे बोलत होत्या. व्यासपीठावर आयमा अध्यक्ष ललित बूब,सरचिटणीस प्रमोद वाघ,माजी अध्यक्ष निखिल पांचाळ,बीओपीपी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे, डेल्टा फिनोकेमच्या संचालिका शरयू देशमुख,आयामा महिला उद्योजिका विकास समितीच्या चेअरमन श्वेता चांडक आदी होते. महिलांचा आज सर्व क्षेत्रात सन्मान होत आहे. सर्वांना व्यक्ती स्वातंत्र्य असले तरी महिलांनी घरचे जग आणि बाहेरची जग याचा समतोल साधण्याचा प्रयत्न करावा, असा सल्लाही अंजली आडे यांनी महिलांना दिला. जिल्ह्याच्या च्या विकासात महिला उद्योजकांचे योगदान मोलाचे आहे.त्यांनी सतत आनंदी राहून आणि भविष्य काळातील बदलाचा अंदाज घेऊन आपल्या उद्योगाचा विस्तार करावा व यशाचा आलेख कायम उंचावत ठेवावा,असे प्रतिपादन प्रमुख पाहुण्या डेल्टा फिनोकेमच्या संचालिका शरयू देशमुख यांनी केले.यावेळी त्यांनी आपले अनुभव कथन करून आज आमची चौथी पिढी या क्षेत्रात आहे ते त्यांनी गौरवाने नमूद केले. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विणा माजगावकर,प्रतिभा जोशी,मृदुला जाधव डॉ.अश्विनी देवरे,रूपाली जोसेफ,सारिका दिवटे, प्रिया पांचाळ,डॉ.भाग्यश्री शिर्के,रेवती पाटील,मनिषा आहेर, स्वाती महाजन,मनिषा सूर्यवंशी,स्वप्ना पाटील,अंकिता अहिरे,डॉ.विजया पाटील, धनलक्ष्मी पटवर्धन,अर्चना नवले, अभिलाषा सावंत, योगिता केळकर, श्रुती सदाशिवन,अपूर्वा जाखडी,अरुणा पाटील,शलाका गोपाळे -भालेराव या महिला उद्योजकांचा स्मृतिचिन्ह आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.प्रास्ताविक आयमाचे अध्यक्ष ललित बूब यांनी केले. महिला उद्योजकांसाठी आयमातर्फे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. सूत्रसंचालन श्वेता चांडक तर आभार प्रदर्शन आय माझे सरचिटणीस प्रमोद वाघ यांनी केले. कार्यक्रमास उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे,उमेश कोठावदे, लोकमतचे महाव्यवस्थापक बी.बी.चांडक, निमाचे माजी अध्यक्ष निशिकांत अहिरे तसेच उद्योजक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.